# प्रकरण तिसरे

---

## श्री गाडगे महाराज मिशनचे प्रशासन

# प्रकरण तिसरे

# श्री गाडगे महाराज मिशनचे प्रशासन

प्रशासन हा कोणत्याही संस्थेचा महत्वाचा घटक असतो. कोणत्याही संस्थेचे प्रशासन जर कार्यक्षम असेल तरच त्या संस्थेचा विकास होत असतो. त्यामुळे जर संस्था प्रगतीपथावर न्यायची असेल तर प्रशासन मजबूत व जबाबदार असणे आवश्यक असते. प्रशासन म्हणजे नेमके काय? प्रशासन या शब्दाची उत्पत्ती काय? हे डॉ. शांताराम भोगल यांनी आपल्या 'Principles of public Administration' या पुस्तकामध्ये स्पष्ट केले आहे. Administration म्हणजे Ad + ministrare हा मूळ लॅटिन शब्द आहे. या शब्दाचा अर्थ सेवा करणे, काळजी घेणे असा आहे. दुसऱ्या शब्दात सांगायचे झाल्यास प्रशासन म्हणजे व्यवस्थापन होय. एल.डी. व्हाईट यांच्या मते "प्रशासन म्हणजे लोकांचे दिग्दर्शन, समन्वय आणि नियंत्रण की ज्यातून आपली ध्येयधोरणे साध्य होतील अशी यंत्रणा होय." ध्येय-धोरणांच्या विकासासाठी प्रयत्नशील असणे हे प्रशासनात महत्वाचे असते.

'श्री गाडगे महाराज मिशन' ही सेवाभावी संस्था आहे. या संस्थेचा कार्य विस्तार महाराष्ट्रातील २२ जिल्हयांत झालेला आहे. या संस्थेचे कार्य मोठे आहे. या संस्थेने २000 साली आपल्या कार्याची ५0 वर्षे पूर्ण केली आहेत. या काळात मिशनने आपल्या कार्य विकासासाठी भक्कम अशी प्रशासन व्यवस्था निर्माण केली आहे.

प्रस्तुत प्रकरणात श्री गाडगे महाराज मिशनच्या गेल्या ५0 वर्षातील प्रशासनाचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे.

**प्रशासनाचा पहिला टप्पा** (इ.स. १९५२ ते इ.स.१९७२):

इ.स.१९५२ मध्ये श्री संत गाडगेबाबा यांनी मिशनची स्थापना केली. श्री गाडगेबाबांचे मिशन स्थापन करण्यापाठीमागे अनेक हेतू होते. गाडगेबाबांनी गृहत्यागानंतर (इ.स.१९0५) समाजसेवा कार्याला सुरूवात केली. इ.स. १९0८

मध्ये सहकारी मंडळीच्या सहाय्याने अमरावती जिल्ह्यात पूर्णा नदीकाठी प्रथम घाट बांधला. ही त्यांच्या रचनात्मक सामाजिक कार्याची सुरूवात होती. त्यानंतर त्यांनी अनेक ठिकाणी गरजेनुसार धर्मशाळा स्थापन केल्या, अंध-पंगु रोग्यांसाठी सदावर्ते सुरू केली, वृद्धाश्रम सुरू केली, मुक्या जनावरांसाठी गोरक्षण संस्था चालू केल्या. त्यांनी अशा प्रकारच्या अनेक संस्था, शाखा-उपशाखा महाराष्ट्रभर सुरू केल्या होत्या. ह्या सर्व संस्था, शाखा उपशाखांचा कारभार आपल्या पश्चात व्यवस्थित चालावा, सर्व संस्थांच्या कारभाराचे एक मुख्य ठिकाण असावे, सर्व शाखांना संस्थात्मक स्वरूप यावे, अशा अनेक उद्दात्त हेतूने मिशनची मुंबई या ठिकाणी स्थापना केली. मिशनच्या स्थापनेमुळे संस्थेच्या कार्यास गती मिळाली. संस्थेचा विस्तार वाढू लागला. त्यासाठी कार्यक्षम अशा प्रशासनाची गरज होती. ही गरज लक्षात घेऊन श्री गाडगेबाबांनी उच्चशिक्षित व्यक्ती आणि सहकारी मंडळी यांच्या बरोबर चर्चा करून स्वत: मिशनच्या प्रशासनाचा आराखडा तयार केला. प्रशासनामध्ये विश्वासू व्यक्तींचा समावेश करून त्यांच्याकडे कारभाराची जबाबदारी सोपवली. स्वत: मात्र मिशनमध्ये कोणतेही अधिकाराचे पद स्वीकारले नाही.[१] हे आपणास मिशनच्या प्रशासनाच्या पुढील ढाच्यावरून दिसून येईल.

**मिशन प्रशासनाचा ढाचा** (इ.स.१९५२ ते १९७२):

अध्यक्ष - अच्युतराव गुलाबराव देशमुख.

उपाध्यक्ष - १. श्रीमंत मालोजीराजे नाईक निंबाळकर.
२. श्री. रा.ब. जयंतीलाल मानकर.

खजिनदार - जे. व्ही. जोशी.

जनरल सेक्रेटरी- यशवंत तुकाराम शिंदे.

सभासद - १. जी.डी. तपासे.
२. पी.ए. म्हात्रे.
३. एस. डी. जाधव.

४. शेठ दुर्गा पांडुरंग दुर्गय्या.

५. ह.भ.प. कैकाडी महाराज.

६. विश्वनाथ वाघ.

७. बबन महाराज कळसकर.

८. यशवंतराव माने.

९. एस. बी. भोजने वकील.

१०. प्रभाकर गणपतराव जाधव.

११. गुणंवतराव बा. चराटे.

इत्यादी व्यक्तींची श्री गाडगेबाबांनी मिशनच्या प्रशासनपदी नियुक्ती केली आणि मिशनचा कारभार या व्यक्तींकडे सोपवला.[२] या व्यक्तींनी मिशनच्या प्रशासनाची धुरा यशस्वीपणे सांभाळली. मिशनचा कार्यविस्तार केला.

**दुसरा टप्पा** - (इ.स. १९७२ ते इ.स. २००२)

सुरूवातीच्या कालखंडात मिशनच्या पदाधिकाऱ्यांच्या कार्यक्षम प्रशासनामुळे इ.स. १९७२ पर्यत मिशन संचलित शाखांची संख्या सुमारे ३७ पर्यंत पोहचली. मिशन संचलित शाखांच्या वाढत्या संख्येमुळे मिशन प्रशासनात काळानुरूप बदल करणे गरजेचे वाटू लागले. हे बदल करण्यासाठी मिशनच्या नेतृत्वाने (प्रशासनाने) श्री गाडगे महाराज मिशनची घटना दुरूस्ती करण्याचे ठरविले. त्यानुसार सन १९७१ मध्ये घटना दुरूस्तीचा ठराव संमत करण्यात आला. ह्या ठरावानंतर दिनांक १. ०६. १९७१ रोजी मिशनच्या मूळ घटनेत दुरूस्ती केली आणि हया घटना दुरूस्तीनुसार मिशनचा कारभार चालविला जाईल असे ठरविण्यात आले. घटना दुरूस्तीमध्ये मिशनच्या प्रशासनाची कार्यक्षमता वाढविण्यासाठी खालील घटकांचा नव्याने समावेश केला गेला.

१. सर्वसाधारण समिती

२. केंद्रीय कार्यकारी मंडळ

३. विश्वस्त मंडळ

४. आश्रयदाता

५. हितचिंतक

६. आजीवसेवक, प्रचारक व सेवक

मिशनच्या सन १९७१ च्या घटना दुरूस्तीनुसार वरील बाबींचा मिशनच्या प्रशासन व्यवस्थेत समावेश केला गेला. त्यांची निवड पद्धती, कार्ये व कामकाजाबाबतची नियमावली इ. गोष्टींचा मिशनच्या घटनेत स्पष्ट उल्लेख करण्यात आला आहे.[३]

## १. सर्वसाधारण समिती: (जनरल गव्हर्निंग बॉडी):

सन १९७१ च्या श्री गाडगे महाराज मिशनच्या घटना दुरूस्तीनुसार मिशनची सर्वसाधारण समिती अस्तित्वात आली. सर्वसाधारण समितीमध्ये अध्यक्ष, उपाध्यक्ष, चेअरमन व चिटणीस आणि मशिनच्या अधिकारी वर्गाचा समावेश करण्यात आला. सर्व साधारण समितीमधील सर्व व्यक्तींनी दरवर्षी रूपये १00 वर्गणी मिशनला दिली पाहिजे असे बंधनकारक केले. सर्वसाधारण समितीची निवड पद्धती निश्चित करण्यात आली.

**सर्वसाधारण समितीची निवडपद्धती -**

सर्वसाधारण समितीची निवड पद्धती खालीलप्रमाणे -

१. मिशनच्या श्रेष्ठ आजीव सेवकांमधून बहुमताने निवडलेली कोणतीही व्यक्ती मिशनची अध्यक्ष असेल जर असा आजीव सेवक मिळत नसेल तर मिशनच्या जनरल बॉडीने ( सर्वसाधारण समितीने ) निवड केलेल्या अन्य व्यक्तीचा अध्यक्ष म्हणून स्वीकार केला जातो.

२. सर्वसाधारण समिती मिशनच्या अध्यक्षांच्या मार्गदर्शनाखाली दोन उपाध्यक्ष, एक चेअरमन, दोन चिटणीस व दोन खजिनदार यांची नियुक्ती करते.

३. मिशनशी संलग्न असलेल्या ट्रस्टचा एक प्रतिनिधी, मिशन संचलित शाखेचे काही प्रतिनिधी किंवा चेअरमन यांचीही सर्वसाधारण समितीत निवड करण्यात येते.

४. श्री गाडगे महाराज यांनी आपल्या हयातीत नेमलेले अथवा मिशनच्या केंद्रीय कार्यकारी मंडळाच्या शिफारशीवरून नेमलेले सभासद किंवा आजीव सेवकांनी बहुमताने नेमलेल्या व्यक्तींचा समावेश सर्वसाधारण समितीत करण्यात येतो.

५. श्री गाडगे महाराज मिशनच्या हितचिंतकांच्या शिफारशीवरून निवड केलेल्या आजीव कार्यकर्त्यांचा समावेश सर्वसाधारण समितीमध्ये करण्यात येतो.

६. मिशनने मान्य केलेल्या कोणत्याही योजनेखाली काम करणारे व जनरल गव्हर्निंग बॉडीने, सेंट्रल गव्हर्निंग बॉडीने शिफारस केलेले आजीव सेवक, प्रचारक व सेवक हे मिशनचे सभासद असतील व त्यांना सर्वसाधारण समितीमध्ये मत देण्याचा अधिकार राहील.[४]

**सर्वसाधारण समितीची कार्यपद्धती व कार्ये -**

श्री गाडगे महाराज मिशनच्या प्रशासकीय कामकाजाची कार्यक्षमता वाढविण्यासाठी वर्षातून किमान एकदा किंवा जरूरीप्रमाणे अधिक वेळा खालील कामांचा विचार करण्यासाठी सर्वसाधारण समितीची सभा भरते.

१. वार्षिक अहवाल तयार करणे.

२. हिशोब तपासनीसांनी तपासलेल्या हिशोबांवर चर्चा करणे व त्यावर धोरणात्मक निर्णय घेणे.

३. मिशनच्या अंदाजपत्रकावर चर्चा करणे.

४. तीन वर्षे अधिकार पदावर राहणाऱ्या पदाधिकाऱ्यांची व केंद्रीय कार्यकारी मंडळाची निवड करणेसाठी सभा आयोजित करणे.

५. मिशनच्या विकासासाठी कायम स्वरूपाच्या नव्या योजनांची आखणी करणे व त्यांची अंमलबजावणी होण्यासाठी प्रयत्न करणे.

६. मिशनच्या कामकाजाचे नियम करणे, जुन्या, कालबाहय नियमांत दुरूस्ती करणे.

७. मिशनमध्ये आजीव सेवकांचा स्वीकार करणे.

८. हितचिंतक व प्रत्यक्ष आजीव कार्यकर्ते यांची निवड करणे.

९. विश्वस्तांची निवड करणे.

१०. हिशोब तपासनीसांची निवड करणे.[५]

यावरील कार्याशिवाय मिशनच्या विकासाच्या इतर बाबींचा विचार करण्याची जबाबदारी ही सर्वसाधारण समितीकडे आहे.

## २. केंद्रीय कार्यकारी मंडळ:

श्री गाडगे महाराज मिशनच्या सन १९७१ च्या घटनादुरूस्तीनुसार केंद्रीय कार्यकारी मंडळ अस्तित्वात आले.

**केंद्रीय कार्यकारी मंडळ निवड पद्धती -**

१. सर्वसाधारण समिती प्रत्येक तीन वर्षानंतर केंद्रीय कार्यकारी मंडळाची निवड करते. सर्वसाधारण समितीमार्फत केंद्रीय कार्यकारी मंडळाचा अध्यक्ष, दोन उपाध्यक्ष, एक चेअरमन, दोन सेक्रेटरी, दोन खजिनदार यांची निवड केली जाते.

२. श्री गाडगे महाराज मिशनच्या आजीव सेवकांच्यामार्फत तीन प्रतिनिधींची केंद्रीय कार्यकारी मंडळावर निवड केली जाते.

३. मिशनच्या विश्वस्तांमार्फत केंद्रीय कार्यकारी मंडळावर तीन विश्वस्तांची निवड केली जाते.

४. तसेच श्री गाडगे महाराज मिशन संचलित केंद्रे, संस्था, शाखा व संलग्न संस्थांचे पदाधिकारी यांच्यामार्फत जास्तीत जास्त पाच प्रतिनिधी निवडतात.

५. याशिवाय श्री गाडगे महाराज मिशनचे हितचिंतक, व प्रचारकांमधून प्रत्येकी तीन प्रतिनिधी निवडून मिशनच्या केंद्रीय कार्यकारी मंडळावर पाठवतात.

मिशनच्या सन १९७१ च्या घटना दुरूस्तीमध्ये असे नमूद करण्यात आले आहे की जर पदाधिकाऱ्यांतील आणि केंद्रीय कार्यकारी मंडळातील एखादी जागा रिक्त झाल्यास ती फक्त मिशनच्या केंद्रीय कार्यकारी मंडळाद्वारे भरली जाईल.[६]

**केंद्रीय कार्यकारी मंडळाची कार्यपद्धती व कार्ये -**

श्री गाडगे महाराज मिशनच्या घटनेतील तरतुदीप्रमाणे केंद्रीय कार्यकारी मंडळाची कार्यपद्धती व कार्ये पुढीलप्रमाणे ठरविण्यात आली आहेत.

१. केंद्रीय कार्यकारी मंडळाची तीन वर्षासाठी नियुक्ती करण्यात येते. केंद्रीय कार्यकारी मंडळ मिशनच्या निरनिराळया शाखा व केंद्रे यांच्याकरिता ब्रँच एक्झिक्युटिव्ह कमिट्या नेमते. त्यामध्ये अध्यक्ष, शाखांचे चिटणीस, खजिनदार व प्रत्येक शाखांत असलेले सर्व आजीव सेवक आणि सर्व शाखांचे विश्वस्त असतात.

२. ब्रँच एक्झिक्युटिव्ह बोर्डाला ( शाखा कार्यकारी मंडळ ) सेंट्रल एक्झिक्युटिव्ह बोर्ड वेळोवेळी जे आदेश देते, त्याप्रमाणे शाखांचे किंवा मिशनच्या केंद्राचे कामकाज चालविणे बंधनकारक केले आहे. ज्या ठिकाणी अशी शाखा कार्यकारी मंडळे नेमण्यात येणार नाहीत त्या ठिकाणी विश्वस्त मंडळ हेच शाखा कार्यकारी मंडळ आहे असे समजण्यात येते.

३. केंद्रीय कार्यकारी मंडळातील काही पदाधिकारी व इतर पाच सभासद ह्यांच्यामधून स्थायी समितीची नेमणूक केली जाते. स्थायी समितीची नेमणूक करण्याची जबाबदारी केंद्रीय कार्यकारी मंडळाकडे असते. स्थायी समितीकडे केंद्रीय कार्य कारी मंडळात घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी करणेची जबाबदारी असते. स्थायी समितीमध्ये एक अध्यक्ष व दोन उपाध्यक्ष असतात. स्थायी समितीच्या अध्यक्षाची व उपाध्यक्षाची निवड केंद्रीय कार्यकारी मंडळ करते. स्थायी समितीतील सदस्य सलग पाचवेळा सभेस गैरहजर असेल तर त्याचे सभासदत्व रद्द केले जाते व त्यांच्या जागी केंद्रीय कार्यकारी मंडळ नवीन सभासदांची नियुक्ती करते.

४. केंद्रीय कार्यकारी मंडळाची सभा दर तीन महिन्यांनी भरते. जरूरी भासल्यास मुदतीच्या आत सभा भरविली जाते.

## ३. विश्वस्त मंडळ -

श्री गाडगे महाराज मिशनची १९७१ साली घटना दुरूस्ती केली व त्यामध्ये विश्वस्त मंडळाचा समावेश केला. विश्वस्त कोणास म्हणावे हे ठरविले. त्याप्रमाणे श्री गाडगे महाराज यांनी स्थापन केलेल्या किंवा मिशनमध्ये सामील करून घेतलेल्या प्रत्येक शाखा, आश्रमशाळा, धर्मशाळा व मिशनच्या कार्याची इतर केंद्रे यातील प्रमुख व संचालक सदस्यांचा विश्वस्तांमध्ये समावेश केला आणि त्यांनी मिशनच्या कार्यालयाला मदत म्हणून कमीत कमी १00 रूपये दरवर्षी दयावेत असे ठरविले. त्याचप्रमाणे शाखा विश्वस्तांची कामे ही ठरवून दिली.[७]

**मिशनच्या शाखा विश्वस्तांची निवडपद्धती अधिकार व कार्ये -**

१. मिशनच्या शाखांचे सर्व विश्वस्त, त्यांच्या ट्रस्टडीजमध्ये नमूद केलेल्या नेमणूक पद्धतीने निवडले जातात किंवा मिशनच्या सर्वसाधारण समितीकडून त्यांची निवड केली जाते.

२. शाखा विश्वस्तांच्या कार्याचा कालखंड मिशनने ठरवून दिलेल्या नियमानुसार असतो.

३. ट्रस्टच्या मालमत्ता, पैसे गुंतवण्याचे व्यवहार, रोखे व मिशनच्या शाखा व केंद्रे यांच्या मालकीच्या सर्व स्थावर मिळकती विश्वस्तांच्या कब्जात असतात. धर्मशाळा ट्रस्टडीडच्या कलमान्वये केंद्रीय कार्यकारी मंडळाच्या देखरेखीखाली विश्वस्त त्याची व्यवस्था पाहतील असे ठरविण्यात आले आहे. आणि त्याप्रमाणेच विश्वस्तांकडून कामकाज चालविले जाते.[८] विश्वस्तांची निवड शक्यतो ट्रस्ट असणाऱ्या शाखेमध्येच केली जाते ( उदा. धर्मशाळेचे ट्रस्ट )

**मिशन संचलित ट्रस्टच्या मालमत्तेचा कारभार -**

श्री गाडगे महाराज मिशन संचलित एकूण १७ ट्रस्ट आहेत. त्या ट्रस्टच्या मालमत्तेचा कारभार कसा असेल हे ठरविण्यात आले आहे.

१. मिशनच्या ट्रस्टच्या मालमत्तेवर, धर्मादाय देणगीवर, मिळकतीवर देखरेख

ठेवण्याचा अधिकार शाखा विश्वस्तांकडे देण्यात आला आहे.

२. मिशन किंवा मिशनच्या शाखा, आश्रम किंवा केंद्रे यांच्याकरिता संपादन केलेल्या मिळकती यांचा विनियोग फक्त त्या त्या शाखा किंवा केंद्रे यांच्याकरिता करण्यात येतो. तसेच दात्याच्या इच्छेप्रमाणे देणगी रक्कमेचा विनियोग मिशनच्या कार्याच्या वेगवेगळया केंद्रांवर करण्यात येईल आणि उरलेली देणगी, रक्कम, मिळकत मिशन संचलित शिक्षणासाठी वापरली जाईल. किंवा मध्यवर्ती कार्यकारी मंडळ ठरवेल त्याप्रमाणे त्या त्या मिळकतीचा विनियोग करता येईल असे ठरविले आहे व त्याप्रमाणे मिशन संचलित ट्रस्टचा कारभार चालविला जातो.[९]

**४. आजीव सेवक -**

मिशनच्या घटनेत आजीव सेवक कोणास म्हणावे हे ठरवून दिलेले आहे. 'ज्यांनी श्री गाडगे महाराज यांच्या ध्येयधोरणांना वाहून घेतलेले आहे व मिशनची तत्वे मान्य केलेली आहेत त्यांना आजीव सेवक म्हणावे.'[१०]

**आजीव सेवक निवडपद्धती व नियमावली :**

**निवडपद्धती -**

श्री गाडगे महाराज मिशन, मिशनची निरनिराळी जीवनदायी व शैक्षणिक कामे पार पाडण्यासाठी आजीव सेवकांची निवड केली जाते. आजीव सेवकाची निवड केंद्रीय कार्यकारी मंडळाने वेळोवेळी केलेल्या नियमानुसार केली जाते.

**आजीव सेवकांच्या श्रेण्या -**

केंद्रीय कार्यकारी मंडळामार्फत आजीव सेवकांच्या तीन श्रेण्या बनवण्यात आल्या आहेत त्या खालीलप्रमाणे -

**अ. तृतीय श्रेणी -**

ज्या सेवकाने मिशनच्या वेगवेगळया शाखांच्या क्षेत्रात किमान ५ वर्षे सतत समाधानकारक सेवा बजावली असेल व ज्याची आजीव सेवक समुहाने व मध्यवर्ती

कार्यकारी मंडळाने शिफारस केली असेल त्याची गव्हर्निंग बॉडीकडून तृतीय श्रेणी आजीव सेवक म्हणून निवड केली जाते.

**ब. द्वितीय श्रेणी -**

तृतीय श्रेणीतील सेवकाने विनावेतन (निर्वाहापुरते ठरवून दिलेले वेतन साहय्य घेऊन) सेवावृत्तीने ३ वर्षे आजीव सेवकाच्या मार्गदर्शनानुसार व पसंतीने मिशन संचलित कोणत्याही संस्थेमध्ये भूषणावह किंवा कौतुकास्पद काम केल्यास त्या सेवकाची गणना आजीव सेवक मंडळाच्या पसंतीने द्वितीय श्रेणीमध्ये केली जाते.

**क. प्रथम श्रेणी -**

द्वितीय श्रेणीतील सेवकाने पूर्वीप्रमाणे तीन वर्षे उत्तम व विनावेतन कार्य केल्यास आणि मिशनच्या सर्व आजीव सेवकांनी त्याच्या कार्यास मान्यता दिल्यास त्या सेवकाचा समावेश प्रथम श्रेणी आजीव सेवकामध्ये केला जातो.

प्रथम श्रेणी आजीव सेवक मिशनच्या पदाधिकारी म्हणून निवडून येण्यास पात्र ठरतो.

**आजीव सेवक नियमावली -**

१. जे आजीव सेवक मिशनच्या कार्याला सर्वस्वी वाहून घेतील त्यांना त्यांच्या स्वत:च्या व कुटुंबाच्या पोषणाकरिता रोख किंवा अन्य मार्गांनी खर्च देण्यात येईल.

२. मिशन स्वीकृत सर्व श्रेणी आजीव सेवकांसाठी वय वर्षे ६५ नंतर निवारा व निर्वाह निधी देण्यात येईल.

३. वय वर्षे ६५ आजीव सेवकाचे निवृत्ती वय असेल. त्यानंतर कोणीही आजीव सेवक स्वच्छेने मिशनच्या कामास हातभार लावील व शक्यतो लावला जावा.

४. सेवानिवृत्तीनंतर द्वितीय व तृतीय श्रेणीच्या आजीव सेवकांसाठी अनुक्रमे रूपये १५00 /- व रूपये १000 /- देण्यात यावी. किंवा त्यांच्या कुटुंबियांना द्यावी.

५. जनरल गव्हर्निंग बॉडीच्या संमतीने आजीव सेवकास आपल्या आजीव सेवकत्वाचा राजीनामा देता येईल परंतु त्यासाठी जनरल गव्हर्निंग बॉडी काही नुकसान भरपाई ची मागणी करेल.[११]

## ५. हितचिंतक, प्रचारक व सेवक -

श्री गाडगे महाराज मिशनच्या प्रशासनाची कार्यक्षमता वाढविण्यासाठी मिशनमध्ये हितचिंतक, प्रचारक, व सेवक यांचा समावेश केला आहे. तसेच हितचिंतक, प्रचारक व सेवक कोणास म्हणावे हे मिशनच्या घटनेमध्ये नमूद केले आहे.

**हितचिंतक -**

'श्री गाडगे महाराजांची तत्वप्रणाली, ध्येय व धोरण मान्य करणारे व मिशनची जनरल बॉडी मान्यता देईल त्याप्रमाणे आणि मिशनने काढलेल्या सर्व संस्थांशी व त्यांच्या कार्याशी सहकार्य करणाऱ्या शिवाय दरवर्षी मिशनला कमीत कमी रूपये २५ /- वर्गणी देणाऱ्या कोणाही स्त्री-पुरूषांना हितचिंतक म्हणावे.

**प्रचारक :**

'श्री गाडगे महाराज यांचे ध्येयधोरणाप्रमाणे कीर्तन करणारा व मिशनच्या तत्वाप्रमाणे काम करणाऱ्या आणि मिशनचे कार्यकारी मंडळाने नियुक्त केलेल्या कोणत्याही व्यक्तीस प्रचारक समजावे.'

**सेवक :**

'श्री गाडगे महाराज यांचे ध्येयधोरण मान्य करणारा व मिशनने अंगिकारलेल्या योजनेत सहभागी होणारा आणि मिशनने नेमलेल्या कोणत्याही कार्यकर्त्यास सेवक म्हणता येईल.'

**हितचिंतक, प्रचारक व सेवकांसाठी नियम -**

श्री गाडगे महाराज मिशनच्या कोणत्याही हितचिंतकाने, प्रचारकाने किंवा सेवकाने त्याची निवड झाल्यावर जर तो अकार्यक्षम, नियमांचे उल्लंघन करणारा, अपराधी, अप्रामाणिक किंवा स्वार्थासाठी झटणारा आहे किंवा मिशनच्या

ध्येयधोरणांविरूद्ध वर्तणूक करणारा आहे असे आढळून आल्यास सेंट्रल एक्झिक्युटिव्ह बोर्ड त्यास प्रथम हितचिंतक, प्रचारक किंवा सेवक म्हणून कमी करील व चौकशी अंती तो अपराधी (दोषी) आहे असे आढळून आल्यास जनरल बॉडी त्यास मिशनच्या यादीतून कमी करील.[१२]

अशाप्रकारे सन १९७१ च्या श्री गाडगे महाराज मिशनच्या घटना दुरूस्तीमध्ये गाडगे महाराज मिशनच्या प्रशासनाच्या मूळच्या ढाच्यात बदल करण्यात येऊन त्यामध्ये सर्वसाधारण समिती, केंद्रीय कार्यकारी मंडळ, विश्वस्त मंडळ, आश्रयदाता, हितचिंतक, आजीव सेवक, प्रचारक इत्यादी घटकांचा समावेश करण्यात येऊन त्यांची निवडपद्धती, कार्ये व त्यांच्यासाठी नियम ठरवून दिले आणि प्रशासनाचा नवीन आकृतीबंध तयार झाला. या घटना दुरूस्तीनुसार जर मिशनचा कारभार चालत नसेल अथवा त्यामध्ये गोंधळ निर्माण होऊन श्री गाडगे महाराज मिशनचे विर्सजन झाल्यास काय केले जाईल याचीही नोंद मिशनच्या घटना दुरूस्तीमध्ये केली आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे -

श्री गाडगे महाराज मिशनचे विर्सजन झाल्यास मिशनची सर्व कर्जे भागवून कोणत्याही प्रकारची मालमत्ता शिल्लक राहिली तर ती मिशनचे सभासद किंवा संचालक त्यापैकी कोणालाही देण्यात येणार नाही किंवा त्यांच्यामध्ये वाटणी करण्यात येणार नाही तर मिशनच्या विर्सजनाच्यावेळी हजर असलेल्या सभासदांमार्फत मिशनची शिल्लक मालमत्ता दुसऱ्या कोणत्याही मिशनला किंवा सेवाभावी संस्थेला देण्यात येईल असे ठरविण्यात आले आहे.[१३]

## मिशन संचलित शाखा-उपशाखांचे प्रशासन :

श्री गाडगे महाराज मिशन ही सेवाभावी संस्था आहे. या संस्थेने आपल्या कार्याचा विस्तार संपूर्ण महाराष्ट्रभर केलेला आहे. त्यामुळे मिशन संचलित अनेक शाखा-उपशाखा राज्यभर कार्यरत आहेत. त्यामध्ये धर्मशाळा, ट्रस्टस, आश्रमशाळा, वृद्धाश्रम, गोरक्षण संस्था, वसतिगृहे, अनाथ बालकाश्रम, पाळणाघरे, दवाखाने,

वाचनालये, माध्यमिक शाळा, ज्युनियर कॉलेज इत्यादींचा समावेश आहे, या शाखा उपशाखांच्या प्रशासनाची माहिती पुढीलप्रमाणे आहे -

**धर्मशाळा प्रशासन -**

निष्काम कर्मयोगी संत गाडगेबाबा ५० वर्षे कण कण झिजवून साऱ्या महाराष्ट्रात वणवण भटकले. कणा-कणांनी कोट्यावधी रूपये जमवून त्याचा उपयोग त्यांनी जनतेच्या सोयीसाठी धार्मिक ठिकाणी धर्मशाळा बांधण्यासाठी केला. त्यांनी हयातभर २९ धर्मशाळा स्थापन केल्या. मिशनच्या स्थापनेनंतर ह्या धर्मशाळा श्री गाडगे महाराज मिशनला जोडून घेऊन सर्व धर्मशाळा सार्वजनिक विश्वस्त संस्था नियमाखाली नोंदवून घेतल्या, धर्मशाळांचे ट्रस्ट स्थापन केले. धर्मशाळेचे प्रशासन कार्यक्षमपणे चालविण्यासाठी प्रत्येक धर्मशाळेत विश्वस्त मंडळाची स्थापना केली. त्याचबरोबर व्यवस्थापक व सेवक मंडळाची गरजेनुरूप नियुक्ती केली.[१४] धर्मशाळेत येणाऱ्या यात्रेकरूंना व गरजूंना कोणत्याही प्रकारचा त्रास होता कामा नये यासाठी धर्मशाळेतील सेवकांसाठी कठोर नियम केले. इतकेच नव्हे तर अतिशय चोखपणे ते सर्व नियम पाळले जातील याची दक्षता घेतली.

**धर्मशाळेतील सेवकांसाठी नियमावली -**

१. प्रत्येक धर्मशाळेतील सेवकाने दररोज पहाटे ५ वाजता उठून आपली कामे वेळच्यावेळी आणि व्यवस्थित करावीत.

२. सेवकाने धर्मशाळा सोडून कामाशिवाय बाहेर जाऊ नये.

३. धर्मशाळेतील सेवक निर्व्यसनी असावा. ज्यांना व्यसन ताब्यात ठेवता येत नाही त्यांनी धर्मशाळा सोडून जावे.

४. सर्वांनी एकत्र जेवावे, जेवणातले पदार्थ एकच असावेत. जेवणानंतर प्रत्येकाने आपआपली जेवणाची भांडी स्वच्छ करून ठेवावीत.

५. सेवकाने धर्मशाळेत जर मित्र किंवा नातेवाईक आले तर फक्त एक दिवसाचा पाहुणचार करावा. त्यानंतर त्यांची सोय बाहेर पहावी.



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

६. सेवकांनी यात्रेकरूस जेवण्यास बोलाविण्यास जावू नये.

७. सेवकांनी कोणाकडूनही उधार सामान आणू नये. देणाऱ्याने देऊ नये. यात्रेकरूकडून पैसे मागू नयेत.

८. जे कीर्तनकार, अनुयायी येतील त्यांनी बाहेर जेवण करून यावे. त्यांना धर्मशाळेत फक्त एक दिवस झोपण्यास परवानगी दयावी.

९. विश्वस्त, व्यवस्थापक यांनी आपली खाजगी कामे सेवकांना सांगू नयेत करण्याऱ्याने ती करू नयेत.[१५]

वरील सर्व नियम पाळले पाहिजेत अशी गाडगेबाबांची ताकीद होती. हेच नियम आज ही मिशन संचलित धर्मशाळेस लागू आहेत. धर्मशाळेचे नियम मोडल्यास गाडगेबाबा कोणाचीही तमा न बाळगता फटकारत असत हे आपणास त्यांनी दिनांक २० जूलै १९५५ रोजी स्वत:ची मुलगी सौ.अलोकाबाईस पाठवलेल्या पत्रातून दिसून येईल.

"सौ.अलोकाबाईस श्री गाडगेबाबांचा अनंत कोटी नमस्कार,

पत्रास कारण की, तुम्ही मुर्तिजापूर गोरक्षण व धर्मशाळेतून बाहेर पडाल तर बरे होईल. तुम्हाला पैशाचे भूत पक्के लागले आहे. तू मेल्याशिवाय ते भूत निघणार नाही, ज्या माणसाला पैशाचे भूत लागले, तो स्वत:लाच काही खात नाही तर दुसऱ्याला काय देणार? आम्ही तुमच्या हयातीपर्यंत झोपडी ठेवणार नंतर तुम्ही कोठेही घर बांधा व भेटीला येत जा.आता लोकांना गाडगेबुवाची मुलगी म्हणून सांगू नकोस.धर्माने वागवले म्हणून मी बाबांचे नाव सांगते असे म्हणावे---

मी तुम्हाला पंढरपूरहून मुर्तिजापूरला जाताना तीस रूपये दिले ती माझी चूक झाली. आता तुम्ही मला कधीही काही मागू नये व तुम्ही मागितले तरी मी देऊ नये, देवाच्या भक्तीला लागलो म्हणून पांग फिटला. एरवी अडीचशे रूपये काय अडीच रूपये सुध्दा दिले नसते--- काल पाहुणेबोवाने (म्हणजे जावयाने) न विचारता धर्मशाळेच्या खोलीतील सामान काढून खोलीत घुसले, मी नसतो तर ट्रस्टीने खटला भरून त्यांना पोलिसांच्या ताब्यात दिले असते. जिथे धर्मशाळेतील पाण्याचा तांब्या उचलण्याचा मला

हक्क नाही, तेथे तुमची किंमत कोण करतो? पाहूणे बुवाला धर्मशाळेत कामाला ठेवू नये आणि तुम्ही शहाणे असाल तर लावू नये, कुत्र्याला आब आहे, पण तुम्हाला नाही. त्यामुळेच धर्मशाळेला भरपूर दानधर्म होतो, पण तुम्हाला तुमच्या झोपडीवर कुणी दीड पायली ज्वारी आणून देत नाही, तुम्ही कधी महारोग्याला किंवा आंधळया-पांगळयाला जेवू घालून जुना-पुराणा एखादा कपडा देऊन व दोन आणे हातात ठेऊन वाटेला लावले काय? असे एक जरी उदाहरण असेल तर ते मला कळविणे! तुम्ही गाडगेबोवाचे घरातील माणसे गाडगेबोवाजवळ जर बारा आणे त्याग असेल तर तुमच्याजवळ एक रूपया त्याग असावयास पाहिजे--- तीन वेळा झोपडीतील सामान फेकले होते, मोटार आली तेव्हा तू डाळीचे पोते मागितले होते. मी नाही म्हटले, तुला अपमानसुद्धा समजला नाही--- तू गाडगेबोवाची मुलगी म्हणून कोणाला काही मागू नये व व देण्याऱ्याने देऊ नये, असा सर्व जनतेला माझा जाहीर निरोप आहे."[१६]

वरील पत्रातील मजकुरावरून आपणास असे दिसून येते की, गाडगेबाबा धर्मशाळेचे नियम मोडणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस थारा देत नसत. त्यामुळेच आज ही धर्मशाळेचे प्रशासन कार्यक्षमपणे चालू आहे.

**धर्मशाळा प्रशासनामार्फत पुरविल्या जाणाऱ्या सुविधा -**

श्री गाडगे महाराज मिशन संचलित अनेक धर्मशाळा महाराष्ट्रात कार्यरत आहेत. या धर्मशाळेत यात्रेकरू व गरजूंसाठी धर्मशाळा प्रशासनामार्फत काही सुविधा पुरविण्यात येतात त्या सुविधा पुढीलप्रमाणे -

१. धर्मशाळेत दररोज दोन वेळचे जेवण मोफत देण्यात येते.

२. धर्मशाळेत प्रवेशित व्यक्तीस जास्तीत जास्त ७ दिवस राहता येते.

३. धर्मशाळेमार्फत अंध-पंगू, रोग्यांसाठी मोफत वस्त्रदान केले जाते.

४. यात्रेच्या कालखंडात यात्रेकरूंना नावनोंदणी करून स्वयंपाकासाठी भांडी देण्यात येतात व ती परत घेतली जातात.

५. यात्रेव्यतिरिक्तच्या कालखंडात धर्मशाळेचा उपयोग मागासवर्गीय मुला-मुलींच्या वसतिगृहासाठी करतात ( उदा. पंढरपूरची धर्मशाळा )

६. धर्मशाळेत गोर-गरीब मुला-मुलींची लग्ने विनामूल्य लावून दिली जातात.

७. धर्मशाळेत अंध-पंगू, महारोगी, वृद्ध व यात्रेकरूंना आसरा देऊन वैद्यकीय सोयी-सुविधा दिल्या जातात.[१७]

**आश्रमशाळा व वसतिगृह प्रशासन -**

श्री गाडगे महाराज मिशनने महाराष्ट्रातील आदिवासी भागातील मुला-मुलींच्या शिक्षणाची सोय व्हावी तसेच भटक्या-विमुक्त जाती-जमाती व आर्थिकदृष्टया मागासलेल्या समाजाची प्रगती व्हावी यासाठी अनेक ठिकाणी आश्रमशाळा व वसतिगृहे सुरू केली आहेत. या आश्रमशाळा व वसतिगृहे परस्परांशी संबधित आहेत. हया आश्रमशाळेत व वसतिगृहांचे प्रशासन कसे असते याची माहिती पुढीलप्रमाणे -

**प्रशासनातील पदाधिकारी व सेवकवर्ग -**

मिशनमार्फत चालवल्या जाणाऱ्या आश्रमशाळा प्रशासनाची प्रमुख जबाबदारी त्या त्या आश्रमशाळेच्या संचालकावर असते. प्रत्येक आश्रमशाळेत एक संचालक असतो. संचालक हा आश्रमशाळेचा सर्वेसर्वा असतो. त्यानंतर मुख्याध्यापक, उपशिक्षक व नाईक असा सेवक वर्ग असतो. तर वसतिगृह प्रशासनासाठी अधिक्षक साहाय्यक शिपाई व स्वयंपाकी असा सेवकवर्ग कार्यरत असतो.या सर्वांमार्फत आश्रमशाळेचे व वसतिगृहाचे दैनंदिन प्रशासन चालविले जाते.प्रशासनातील सेवकांची संख्या विद्यार्थी संख्येवर अवलंबून असते.

**प्रवेशप्रक्रिया नियम व अटी :-**

१. आश्रमशाळा व वसतिगृहात अनुसूचित जाती, भटक्या-जाती जमातींच्या, मुला-मुलींना मोफत प्रवेश दिला जाईल.

२. प्रवेश अर्जाबरोबर जातीचा दाखला, उत्पन्नाचा दाखला, गुणपत्रक असणे आवश्यक आहे.

३. आश्रमशाळा व वसतिगृहाचे नियमभंग केल्यास वार्षिक खर्च भरून घेऊन संबधित मुलास त्वरीत कमी केले जाईल.

४. सर्व मुला-मुलींनी मिळणारे साहित्य व्यवस्थित ठेवावे.

५. पालकांस अगर नातेवाईकांस आश्रमशाळेच्या वसतिगृहात राहता येणार नाही.

६. उन्हाळा व दिवाळीची सुट्टी मुलांना मिळेल इतर वेळेस शाळेत व वसतिगृहात गैरहजर राहता येणार नाही.

७. जरूरी भासलेस प्रवेशावेळी पालकांसमवेत विद्यार्थ्यास मुलाखतीस यावे लागेल.

८. प्रवेश देताना मागील वर्षी मिळालेल्या गुणांचा विचार केला जाईल.

९. प्रवेश दिल्यानंतर वेळेवर हजर न झाल्यास प्रवेश रद्द करून त्या जागेवर दुसऱ्या मुलाची निवड केली जाईल.

१०. एकदा घेतलेला प्रवेश कोणत्याही सबबीवर रद्द केला जाणार नाही.

११. आश्रमशाळेत कोणताही जाती धर्म पाळला जाणार नाही.[१८]

**आश्रमशाळा व वसतिगृहाची दैनंदिनी -**

आश्रमशाळा व वसतिगृहाच्या दैनंदिन कामकाजामध्ये सुसूत्रता आणण्यासाठी श्री गाडगे महाराज मिशनच्या प्रशासनाने सर्व आश्रमशाळांसाठी दैनंदिनी ठरवून दिलेली आहे. तसेच ती प्रभावीपणे राबवावी असा नियम केलेला आहे. सदरची दैनंदिनी खालीलप्रमाणे-

| तपशील | वेळ |
|---|---|
| प्रात:विधी | ६.00 ते ६. १५ |
| गाडगेबाबांची प्रार्थना | ६.१५ ते ६.४५ |
| परिसर सफाई | ६.४५ ते ७.00 |
| अंघोळ, वैयक्तिक स्वच्छता | ७.00 ते ७.४५ |
| अल्पोपाहार | ७.४५ ते ८.0५ |
| वैयक्तिक कामे | ८.0५ ते ८.१५ |

| | |
|---|---|
| अभ्यास | ८.१५ ते १०.०० |
| भोजन | १०.०० ते १०.४५ |
| शालेय कामकाज | ११.०० ते २.०५ |
| दुपारचा अल्पोपहार | २.१५ ते ३.०० |
| शालेय कामकाज | ३.०० ते ५.३० |
| व्यायाम, खेळ, वैयक्तिक कामे | ५.३० ते ६.०० |
| सफाई | ६.०० ते ६.१५ |
| गाडगेबाबांची प्रार्थना | ६.१५ ते ६.४५ |
| भोजन | ६.४५ ते ७.३० |
| वैयक्तिक कामे | ७.३० ते ८.०० |
| रात्र अभ्यासिका | ८.०० ते १०.०० |
| निद्रा,आराम | १०.०० ते ६.०० [१९] |

**प्रशासनामार्फत पुरविल्या जाणाऱ्या सुविधा -**

श्री गाडगे महाराज मिशन संचलित सर्व आश्रमशाळा आणि वसतिगृहातील मुलांसाठी स्थानिक प्रशासनाद्वारे धर्मदाय देणग्या, सेवाभावी संस्थांची मदत आणि मासिक शासकीय अनुदानातून अनेक सुविधा पुरविल्या जातात . त्याचा तपशील पुढीलप्रमाणे -

१. **मोफत शिक्षण -** शिक्षणासाठी कोणतीही शैक्षणिक फी घेतली जात नाही.

२. **गणवेश -** वर्षातून एकदा शाळा सुरू झाल्यानंतर जूलै महिन्यात शालेय गणवेषांचे वाटप केले जाते.

३. **शैक्षणिक साहित्य -** आश्रमशाळेतील प्रत्येक मुला-मुलींना वह्या-पुस्तके, पाट्या, पेन्सिली, पेन, कंपास इ. शैक्षणिक साहित्य दिले जाते.

४. **भोजन व निवास सोय -** आश्रमशाळेत प्रवेश घेतलेल्या सर्व मुला-मुलींसाठी आश्रमशाळा संलग्न वसतिगृहामध्ये निवास व भोजनाची व्यवस्था केली जाते.

५. **औषधोपचार** - प्रवेशित विद्यार्थी जर आजारी पडला तर त्याची वैद्यकीय अधिकाऱ्याकडून तपासणी करून त्या मुलावर योग्य तो औषधोपचार केला जातो. यासाठी विद्यार्थ्यांकडून कोणतीही फी घेतली जात नाही.

६. **केशकर्तन** - आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांचे प्रत्येक महिन्यातील शेवटच्या रविवारी गरजेनुरूप केशकर्तन केले जाते. यासाठी शासनाकडून प्रत्येक मुलास अनुदान मिळते.

७. **दैनंदिन स्वच्छता साहित्य** - आश्रमशाळा व वसतिगृहातील सर्व मुला-मुलींसाठी वैयक्तिक स्वच्छतेसाठी अंघोळीचा साबण, कपडे धुण्याचा साबण, केसांसाठी तेल इत्यादी साहित्य दिले जाते.

८. **अंथरूण-पांघरूण** - प्रत्येक मुलासाठी एक चादर, चटई आणि थंडीच्या दिवसात लोकरी कपडे दिली जातात.[२०]

अशाप्रकारे आश्रमशाळा व वसतिगृहाचे प्रशासन चालविले जाते. वरील सर्व प्रशासनाच्या लेखी नोंदी ठेवल्या जातात. त्या नोंदीच्या सहाय्याने प्रत्येक शाखेचा वार्षिक अहवाल तयार केला जातो. या अहवालाची एक प्रत मुख्याध्यापक जिल्हा समाजकल्याण खात्याकडे जमा करतात. तसेच दुसरी प्रत त्या त्या शाखेचे संचालक श्री गाडगे महाराज मिशनच्या मुख्यालयाकडे जमा करतात.

## निराधार बालगृहाचे प्रशासन -

समाजातील निराश्रित मुला-मुलींच्या जीवनाला नवसंजीवनी मिळावी या उद्देशाने गाडगे महाराज मिशनने 'श्री गाडगे महाराज निराश्रित बालगृह' या नावाने सातारा, पुणे, अमरावती इत्यादी जिल्हयात मिशन संचलित आश्रमशाळांशी संलग्न काही बालगृहे सुरू केली आहेत. या बालगृहाचे प्रशासन पुढीलप्रमाणे -

**प्रवेश पक्रिया -**

समाजामध्ये वावरणाऱ्या निराधार, निराश्रित, बालगुन्हेगार, उनाड, उन्मार्गी मुले, महारोग्यांची पाल्ये व आर्थिक मागासलेपण असलेली मुले-मुली यांची जिल्हा निरीक्षण

गृहामार्फत बाल न्यायालयाच्या आदेशाने तपासणी केली जाते. त्यानंतर निराधार बालगृह शाखेचा प्रवेश अर्ज दिला जातो. प्रवेश अर्जातील अटींची पूर्तता केल्यानंतर अशा मुलांना प्रवेश दिला जातो. प्रवेश दिल्यापासून २४ तासांच्या आत प्रवेशित विद्यार्थ्यांची शासकीय वैद्यकीय अधिकाऱ्याकडून तपासणी केली जाते. त्यानंतर तपासणी अहवाल तयार करून जिल्हा न्यायालयाकडे पाठविला जातो.

**बालगृहातील पुरविण्यात येणाऱ्या सुविधा -**

मिशन संचलित बालगृहे आश्रमशाळांना संलग्न आहेत. आश्रमशाळेतील मुला-मुलींना ज्या सुविधा पुरविल्या जातात त्या सर्व सुविधा बालगृहातील मुला-मुलींना पुरविल्या जातात. या सेवा सुविधांसाठी लागणारे अनुदान महिला व बालकल्याण विभाग महाराष्ट्र राज्य यांच्याकडून जिल्हा समाजकल्याण विभागाकडे दिले जाते.

**प्रशासकीय कर्मचारी वर्ग -**

बालगृह चालविणारा प्रशासकीय वर्गाची व कर्मचाऱ्यांची नियुक्ती समाजकल्याण विभाग महाराष्ट्र राज्य यांच्याकडून केली जाते. यामध्ये अधिक्षक, लिपिक, काळजीवाहक, स्वयंपाकी, रखवालदार इत्यादी सेवक वर्ग असतो. तसेच आवश्यकता असल्यास मनोवैद्यकीय अधिकाऱ्याची नियुक्ती केली जाते. बालगृहातील विद्यार्थी, मुला- मुलींना मिशन संचलित सर्व आश्रमशाळांमध्ये मोफत शिक्षण दिले जाते.

**बालगृहाचे विभाग -**

बालगृहाचे सर्वसामान्य दोन विभाग पाडलेले दिसून येतात.

१. **कनिष्ठ बालगृह** - यामध्ये इयत्ता १ ली ते इयत्ता ५ वी पर्यंतच्या मुला-मुलींचा समावेश असतो.

२. **वरिष्ठ बालगृह** - यामध्ये इयत्ता ६ वी ते इयत्ता १० वी पर्यंतच्या मुला-मुलींचा समावेश असतो.

**आहार -**

बालगृहातील मुला-मुलींना शासनाने ठरवून दिलेल्या वयोगट तसेच आहार नियमानुसार सात्विक आहार दिला जातो.

**बालगृह दैनंदिन नोंदी -**

बालगृहाच्या दैनंदिन कामकाजाच्या नोंदी ठेवल्या जातात. यामध्ये आर्थिक व्यवहार नोंदवह्या, विद्यार्थ्यांचा मासिक प्रगती अहवाल, आवक-जावक रजिस्टर, संस्थेचा परस्परांशी झालेला पत्रव्यवहार रजिस्टर, अधिकारी भेट नोंदवह्या, (भेटी देणाऱ्या अधिकाऱ्यांचे अभिप्राय ) दैनंदिन आहार तपासणी अहवाल इत्यादी बाबींचा समावेश असतो.

**बालगृह समित्या -**

यामध्ये आहार समिती, खेळ समिती, स्वच्छता समिती, आरोग्य समिती, अभ्यास समिती, मनोरंजन समिती अशा प्रकारच्या समित्या असतात. या सर्व समितीमध्ये विद्यार्थी असतात. या समित्यांवर बालगृह अधिक्षकांची देखरेख असते. बालगृहातील मुलांचे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर या मुलांचे पुर्नवसन जिल्हा न्यायालयाच्या आदेशानुसार इतर बालगृहामध्ये केले जाते.[२१]

**वृद्धाश्रम प्रशासन -**

श्री संत गाडगे महाराज ही सेवाभावी संस्था आहे. या संस्थेने निराधार वृद्धांच्या सोयीसाठी गाडगेबाबांच्या नावे वालगांव (जि.अमरावती), दहिगांव-नंदुरा (जि.बुलढाणा), वडगांव (जि.बुलढाणा), पहूर (जि.जळगांव) या ठिकाणी वृद्धाश्रम सुरू केली आहेत. या वृद्धाश्रमाच्या प्रशासन व्यवस्थेसाठी व्यवस्थापक, विश्वस्त, सेवक, आचारी व सफाई कामगार असा सेवकवर्ग नियुक्त केला आहे. मिशन संचलित या वृद्धाश्रमाचा लाभ अनेक वृद्ध लोक घेत आहेत.

या वृद्धाश्रमास समाजकल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडून अनुदान रूपाने मदत मिळते. तसेच धर्मादाय संस्था, धनिक व्यक्ती यांच्या

कडून पैसे आणि वस्तुंच्या स्वरूपात देणगी मिळते.[२२]

**पाळणाघर प्रशासन -**

श्री गाडगे महाराज मिशनमार्फत १९८५साली दहिगांव नंदुरा जि. बुलढाणा या ठिकाणी पाळणाघर सुरू केले आहे. या पाळणाघरामध्ये १ ते ५ वर्षे वय असणारी निराश्रित मुले असतात. या लहान मुलांच्या देखरेखीसाठी व संगोपनासाठी एक शिक्षिका, लहान मुलांना सांभाळणारी सेविका, शिपाई व स्वयंपाकी अशी व्यवस्था केलेली दिसून येते.

मिशन संचलित या पाळणाघरास समाजकल्याण सल्लागार मंडळ, मुंबई यांच्याकडून अनुदान प्राप्त होत असते.[२३]

**मिशनचा आर्थिक व्यवहार** ( Finacial aspects )

कोणत्याही सामाजिक संस्थेच्या वाटचालीसाठी व विकासासाठी आर्थिक पाठबळाची व पुरेशा द्रव्य सहाय्याची गरज असते. जर कोणत्याही सामाजिक संस्था अथवा शाखेकडे पुरेशी आर्थिक सक्षमता नसेल तर ती संस्था आपले कार्य अखंड व सक्षमपणे चालवू शकत नाही असा सार्वत्रिक अनुभव आहे.

श्री गाडगे महाराज मिशन ही सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात कार्य करणारी महाराष्ट्रातील एक महत्त्वाची संस्था आहे. या संस्थेची स्थापना संतशिरोमणी गाडगेबाबा यांनी सन १९५२ मध्ये मुंबई येथे केली. समाजातील दारिद्रय निर्मूलन, व्यसनमुक्ती, अंधश्रध्दा निर्मूलन शिक्षणाद्वारे होऊ शकते, असा श्री गाडगेबाबांचा ठाम विचार होता. हा विचार प्रत्यक्ष कृतीत आणण्यासाठी त्यांनी गाडगे महाराज मिशन संचलित अनेक शैक्षणिक शाखा-उपशाखा महाराष्ट्रात सुरू केल्या. त्याचबरोबर धर्मशाळा, वृद्धाश्रम, निराधार बालकाश्रम, पाळणाघर, गोरक्षण संस्था, पाणपोई, वाचनालये सुरू केली आहेत. आज सुमारे चाळीस हजार दीन-दलित व आदिवासी मुले-मुली मिशनच्या या कार्याचा लाभ घेत आहेत. सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या एवढया मोठ्या संस्थेचा अर्थव्यवहार कसा चालतो? हा व्यवहार चालविण्याऱ्या संस्थेच्या उत्पन्नाच्या बाजू

कोणत्या आहेत? खर्चाच्या बाजू कोणत्या आहेत? याबाबींचा आढावा घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत घटकामध्ये केलेला आहे.

**सुरूवातीच्या कालखंडातील आर्थिक स्थिती -**

श्री गाडगे महाराज मिशन ही शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात कार्य करणारी सेवाभावी संस्था आहे. मिशनचा कार्य विस्तार मोठा आहे. सुरूवातीच्या कालखंडात श्री गाडगे महाराज मिशनला अनेक आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागले. मिशनसाठी मुंबई येथे मुख्यालय सुरू करण्याचे ठरविले होते. परंतू मुख्यालय खरेदीसाठी मिशनकडे पैसे नव्हते. श्री गाडगे महाराज मिशन कामकाजासाठी इमारतीची गरज लक्षात घेऊन श्री गाडगेबाबांच्या कार्यसेवेत असणाऱ्या अनेक दानशूर मंडळापैकी एका व्यक्तीने त्रिभुवन रोड, मुंबई या ठिकाणी असणारी स्वत:च्या मालकीची १४ बाय १० फुटाची खोली मिशनच्या ऑफीससाठी दान दिली. त्यानंतर इ.स. १९५२ मध्ये या ठिकाणी श्री गाडगे महाराज मिशनचे मुख्य कार्यालय सुरू केले.

श्री गाडगे महाराज मिशनने आपले सेवाभावी कार्य करण्यासाठी आदिवासी आश्रमशाळा, मुलींच्या आश्रमशाळा, विद्यार्थी वसतिगृह, वृद्धाश्रम, धर्मशाळा, निराधार बालकाश्रम अशा वेगवेगळया शाखा सुरू केल्या. परंतु या शाखा चालविण्यासाठी सुरूवातीच्या कालखंडात अनेक अडचणी येत होत्या. त्या अडचणी दूर करण्यासाठी श्री गाडगे महाराज मिशनच्या नेतृत्वाने व पदाधिकाऱ्यांनी स्थानिक मदत घेण्याचे ठरविले. स्थानिक पातळीवरील मिशन संचलित शाखांचे संचालक, स्थानिक गावकरी मंडळी, दानशूर व्यक्ती, धर्मादाय संस्था यांच्याकडून जमीन, पैसा, धान्य, कपडे, शैक्षणिक साहित्य इत्यादी स्वरूपात देणग्या व मदत मिळविली. त्याद्वारे मिशनच्या आर्थिक गरजा पूर्ण करण्याचा प्रयत्न केला. सेवक वर्ग, शिक्षक यांना अत्यल्प पगारावर काम करावयास लागले. नंतरच्या कालखंडात सरकारने श्री गाडगे महाराज मिशनच्या कार्याची दखल घेतली. महाराष्ट्र शासनाकडून श्री गाडगे महाराज मिशनला कायमस्वरूपी शासकीय

अनुदान मिळू लागले. त्यामुळे मिशनच्या आर्थिक अडचणीची तीव्रता कमी होण्यास मदत झाली. त्यामुळे नंतरच्या कालखंडात मिशनचा कार्यविस्तार झपाटयाने घडून आला.[२४]

सन १९८२ पर्यंत श्री गाडगे महाराज मिशन संचलित शैक्षणिक शाखांमधील विद्यार्थी संख्या दहा हजारापर्यंत होती. त्यासाठी महाराष्ट्र शासनाकडून दरवर्षी सुमारे ३० लाख रूपये अनुदान मिळत होते. श्री गाडगे महाराज मिशनचा एकूण खर्च सुमारे ३६ लाखापेक्षा अधिक होता. शासकीय अनुदानापेक्षा अधिक झालेला खर्च धर्मादाय देणगीतून भागविला जात असे.[२५]

## श्री गाडगे महाराज मिशनच्या आर्थिक बाजू -

श्री गाडगे महाराज मिशन ही प्रामुख्याने शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात कार्य करणारी संस्था आहे. हया संस्थेचा आर्थिक व्यवहार प्रामुख्याने धर्मादाय देणग्या व शासकीय अनुदानातून चालतो. श्री गाडगे महाराज मिशनच्या अनेक आर्थिक उलाढाली आहेत. त्याचे दोन प्रकारात विभाजन करता येते.

### अ) मिशनच्या उत्पन्नाच्या बाजू :

श्री गाडगे महाराज मिशनच्या उत्पन्नाच्या बाजूमध्ये मिशनच्या मालकीच्या जमिनी, स्थावर मालमत्ता, मिशन संचलित शाखा-उपशाखांना मिळणारे शासकीय अनुदान, मिशनच्या बँकेतील ठेवींवर मिळणारे व्याज, मिशनचे सदस्य, सेवक, हितचिंतक, आजीव सदस्य यांच्याकडून मिळणारी सभासद फी, धर्मादाय देणग्या, (वस्तू, पैसा, जमीन... इत्यादी स्वरूपातील ), मिशन शाखा संचलित शेती, पीठाच्या गरण्या इत्यादी उपक्रम अशा घटकांचा मिशनच्या आर्थिक उत्पन्नाच्या बाबींमध्ये समावेश होतो.

### मिशनच्या मालकीच्या जमिनी -

श्री गाडगे महाराज मिशन ही संस्था विशेषत: आदिवासी व मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी फार मोठे कार्य करते. महाराष्ट्रातील २२ पेक्षा अधिक जिल्हयात श्री गाडगे महाराज मिशन संचलित आश्रमशाळा, निराधार बालकाश्रम, कन्याशाळा, वसतिगृहे कार्यरत आहेत. या शाखा- उपशाखा सुरू करण्यासाठी अनेक

सेवाभावी व्यक्तींनी श्री गाडगे महाराज मिशनला जमिनी दान दिलेल्या आहेत. उदा. श्री गाडगे महाराज प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळा, गोंदवले हिचेसाठी श्री यशवंतराव मानेबाबा यांनी स्वत:च्या मालकीची २५ एकर शेतजमीन दान दिलेली आहे. श्री शिवाजी महानवर यांनी २० एकर जमीन श्री संत गाडगे महाराज प्राथमिक आश्रमशाळा, येळेवाडी (ता. माण) या शाखेस दिलेली आहे. तसेच श्री गाडगे महाराज प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळा ब्रम्हपुरी ( ता. कोरेगांव, जि.सातारा ) या शाखेस तत्कालीन संचालक कै. श्री जिजाबा कोंडिबा मोहिते-पाटील यांनी ७ एकर २३ गुंठे जमीन दान म्हणून मिळविली आहे. श्री गाडगे महाराज समाधी मंदिर अमरावती यासाठी कै. रघुनाथसिंह राठोड यांनी स्वत:च्या मलकीची १० हजार चौरस फुट जमीन दान दिलेली आहे. अशाप्रकारे श्री गाडगे महाराज मिशन संचलित अनेक शाखांना जमिनी दान मिळालेल्या आहेत.[२६]

श्री गाडगे महाराज मिशन संचलित शाखांच्या मालकीच्या जमीनीवर स्थानिक प्रशासनाच्या मागदर्शनाखाली व विद्यार्थ्यांच्या सहकार्याने शेती केली जाते . त्या शेतीतून मिळणाऱ्या उत्पन्नाचा वापर आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांच्या भोजन खर्चासाठी केला जातो. तसेच मुलांच्या भोजनासाठी शासकीय अनुदानही मिळते.[२७]

**शासकीय अनुदान -**

श्री गाडगे महाराज मिशन ही संस्था अनेक शाखा-उपशाखा चालविते. या शाखांसाठी श्री गाडगे महाराज मिशनला दरवर्षी शासकीय अनुदान मिळते. या अनुदानामध्ये आश्रमशाळा अनुदान, वसतिगृह अनुदान, निराधार बालकाश्रम अनुदान, पोस्टबेसिक आश्रमशाळा व विद्यालय अनुदान, वृद्धाश्रम अनुदान, पाळणाघर अनुदान इत्यादी अनुदानाचा समावेश होतो. वरील शाखांना मिळणारे अनुदान हे प्रामुख्याने वसतिगृहातील मुलांचा भोजन खर्च, वैद्यकीय खर्च, शैक्षणिक साहित्य खर्च कपडे इत्यादीसाठी असते.

श्री गाडगे महाराज मिशनला सन १९९१ मध्ये वसतिगृह, आश्रमशाळा, पोस्टबेसिक आश्रमशाळा व विद्यालये यासाठी रूपये १,६७,९८,८७९/- इतके वार्षिक

अनुदान मिळाले होते. तसेच वृद्धाश्रम, निराधर बालकाश्रम, पाळणाघरे यासाठी एकूण रूपये ३७,९,१३६/- इतके वार्षिक अनुदान मिळालेले होते.[२८]

सन २००२ मध्ये श्री गाडगे महाराज मिशन संचलित आश्रमशाळा, वसतिगृहे, पोस्टबेसिक आश्रमशाळा व विद्यालये, वृद्धाश्रम, बालिकाश्रम, पाळणाघर रूपये ८,६२,३२,५९२ /- वार्षिक शासकीय अनुदान मिळालेले दिसून येते.[२९]

**इमारत बांधकाम अनुदान -**

श्री गाडगे महाराज मिशनला महारष्ट्र शासनाकडून इमारत बांधकामासाठी रूपये १७,७२,७२६ इतके अनुदान मिळाले होते.

सन २००२ मध्ये इमारत बांधकाम अनुदान ३६,७२,८३५ रूपये इतके मिळाले होते.[३०]

## मिशनला मिळणाऱ्या देणग्या -

श्री गाडगे महाराज मिशन दरवर्षी हजारो रूपयांच्या देणग्या मिळतात .या देणग्यांचा उपयोग सेवाभावी कार्यासाठी केला जातो. श्री गाडगे महाराज मिशनला पैसे, वस्तु, इमारती, जमीनी इत्यादी स्वरूपात देणग्या मिळतात. शन १९९२-९३ मध्ये मिशनला महाराष्ट्र राज्य दूध महासंघ, मुंबई यांचेकडून रूपये ५०,०००/- देणगी मिळालेली होती. तसेच इतर देणगीतून रूपये २६,८१५ /- मिळाले होते म्हणजे सन १९९३ मध्ये मिशनला पैशाच्या स्वरूपात एकूण ७६,८१५ /- रूपये देणगी मिळालेली होती असे दिसून येते. मिशन संचलित शाखांनाही स्थानिक पातळीवर पैसे, वस्तु इत्यादीच्या स्वरूपात देणगी मिळते.[३१]

**वस्तुरूपातील देणग्या -**

श्री गाडगे महाराज मिशन संचलित शाखांना दानशूर व्यक्ती व सेवाभावी संस्थाकडून शैक्षणिक साहित्य, कपडे, अन्न धान्य, इमारत साहित्य, रूग्णवाहिका वाहने, संगणक, इलेक्ट्रीक साहित्य, स्वयंपाक इंधनासाठी झाडे, गोरक्षणासाठी चारा इत्यादी स्वरूपात वस्तुरूपाने देणगी मिळते.[३२]

**मिशनच्या उद्दिष्टपूर्तीसाठी मिळणारे अनुदान -**

श्री गाडगे महाराज मिशनने आपल्या कार्याची खालील काही उद्दिष्टे ठरविलेली आहेत.

१. दारूबंदी प्रचार कार्य करणे.

२. अस्पृश्यता निवारण प्रचार कार्य करणे.

३. वृक्ष लागवडीद्वारे पर्यावरण संवर्धन करणे.

४. कीर्तनाद्वारे समाजप्रबोधन करणे इत्यादी.

ही उद्दिष्टये साध्य करण्यासाठी मिशन मधील सेवकवर्ग सतत प्रयत्नशील असतो. श्री गाडगे महाराज मिशनच्या वरील उद्दिष्टपूर्तीसाठी महाराष्ट्र शासनाकडून वार्षिक अनुदान मिळते.

**सन १९९१- ९२ मध्ये -**

दारूबंदी प्रचार कार्यासाठी - रूपये २९, ०१७ /-

अस्पृश्यता निवारण प्रचारकार्यासाठी - रूपये ४९,२०० /-

दारूबंदी प्रचारगाडी दुरूस्तीसाठी - रूपये २३,००० /-

एवढे शासकीय अनुदान मिशनला मिळालेले दिसून येते.[३३]

**गाडगे महाराज मिशनचे निधी -**

श्री गाडगे महाराज मिशनचे वेगवेगळे निधी आहेत. ते खालीलप्रमाणे -

**१. विश्वस्त निधी:**

विश्वस्त निधी मध्ये श्री गाडगेबाबा निधी, गाडगेबाबा पुण्यतिथी निधी, सन्मान्य सेवक निधी इत्यादी निधींचा समावेश आहे.

**सन १९९१ मध्ये -**

गाडगेबाबा निधी- रूपये ४४,५०३ /-

गाडगेबाबा पुण्यतिथी निधी- रूपये १२,००० /-

सामान्य सेवक निधी - रूपये २,६६५ इतका होता

एकूण विश्वस्त निधी - रूपये ५९, १६८ /- एवढा असल्याचे दिसून येते.

**२. जमीन निधी -**

सन १९९१ मध्ये श्री गाडगे महाराज मिशनचा जमीन निधी रूपये ३,१४,६३८ /- एवढा असल्याचे दिसून येते.

**३. मोटारगाडया निधी -**

श्री गाडगे महाराज मिशनच्या काही मोटारगाडया आहेत. या मोटार गाडयांसाठी मिशनने काही निधी उभारला आहे. सन १९९१ मध्ये हा निधी रूपये २,६७,000 /- इतका होता.

**४. विद्यार्थी बक्षीस निधी -**

श्री गाडगे महाराज मिशनमार्फत मिशनसंचलित शाखांमधील इयत्ता १0 वी मध्ये प्रथम तीन क्रमांक पटकवणाऱ्या विद्यार्थ्यांना बक्षीसे दिली जातात. त्यासाठी श्री गाडगे महाराज मिशनने विद्यार्थी बक्षीस निधी उभारला आहे. सन १९९१-९२ मध्ये विद्यार्थी बक्षीस निधी रूपये ९00३ /- रूपये इतका होता. सन २00२ पर्यंत या निधीत वाढ झालेली आहे.

सन २00२ मध्ये विद्यार्थी बक्षीस निधी रूपये ५७,00६ /- एवढ़ा असलेला दिसून येतो. [३४]

**५. विशेष शैक्षणिक निधी -**

श्री गाडगे महाराज मिशनने शैक्षणिक कार्यासाठी विशेष शैक्षणिक निधी उभारला आहे. सन १९९१-९२ मध्ये हा विशेष शैक्षणिक निधी रूपये २८,00,८६५/- एवढा असल्याचे दिसून येते. [३५]

**बँक ठेवीवरील उत्पन्न :**

श्री गाडगे महाराज मिशन संचलित शाखा-उपशाखांच्या बँकेत ठेवी आहेत. या बँक ठेवी वेगवेगळ्या मुदतीच्या आहेत. त्या म्हणजे मासिक ठेवी, त्रैमासिक ठेवी, सहामासिक ठेवी, वार्षिक ठेवी, कायमस्वरूपाच्या ठेवी इत्यादी या ठेवींचे व्याजदारही भिन्न भिन्न आहेत. काही ठेवींना द.सा.द.शे. काही ३.५%, काही ठेवींना १४.५% तर काही ठेवींना १२.५% व्याज आहे.[३६]

मिशनच्या ठेवीवर मिळणारे व्याज श्री गाडगे महाराज मिशनच्या उत्पन्नाचाच भाग असल्याचे दिसून येते.

## श्री गाडगे महाराज मिशनच्या खर्चाच्या बाजू -

श्री गाडगे महाराज मिशनच्या काही उत्पन्नाच्या बाजू आहेत, त्याचप्रमाणे काही खर्चाच्या बाजू आहेत. हया खर्चाच्या बाबी शासकीय अनुदान व धर्मादाय देणग्या यामधून चालविल्या जातात.

गाडगे महाराज मिशनच्या खर्चाच्या बाजूमध्ये मिशनच्या कार्यालयीन खर्च, धर्मादाय खर्च, मिशनच्या उद्दिष्टपूर्तीसाठीचा खर्च, इमारत बांधकाम व दुरूस्ती खर्च इमारत भाडे खर्च इत्यादी बाबींचा समावेश होतो.

**मिशन कार्यालय खर्च -**

श्री गाडगे महाराज मिशनचे मुख्य कार्यालय मुंबई या ठिकाणी आहे. मिशन कार्यालय खर्चामध्ये कर्मचारी पगार इमारत भाडे, कर, इलेक्ट्रीक खर्च, छपाई खर्च , स्टेशनरी खर्च, टेलीफोन, टपाल-तार खर्च, जाहिरात खर्च इत्यादी बाबींचा समावेश होतो.

सन १९९१ मध्ये मिशन कार्यालयाचा वार्षिक खर्च रूपये २,0६,७0६ /- इतका असल्याचे दिसून येते. तर सन २00१ मध्ये मिशन कार्यालयाचा वार्षिक खर्च रूपये ४,५२,८२८ /- एवढा असल्याचे दिसून येते.[३७]

**वाहनांवरील खर्च -**

श्री गाडगे महाराज मिशनच्या पदाधिकाऱ्यांसाठी मिशनच्या मालकीची काही मोटार वाहने आहेत. या वाहनांवर दरवर्षी काही खर्च होतो. शन १९९१ मध्ये मिशनच्या मालकीच्या वाहनांवर रूपये २,९0,000 /- इतका वार्षिक खर्च झालेला दिसून येतो.

तर सन २00२ मध्ये मोटारवाहनांवर रूपये ४,११,३४६/- इतका खर्च झालेला आढळतो.

**दारूबंदी व अस्पृश्यता निवारण प्रचारक खर्च -**

श्री गाडगे महाराज मिशनच्या अनेक उद्दिष्टापैकी दारूबंदी व अस्पृश्यता निवारण ही महत्वाची उद्दिष्टे आहेत. यासाठी मिशन प्रशासन दरवर्षी काही खर्च करते.

सन १९९१ मध्ये दारूबंदी व अस्पृश्यता निवारण प्रचार कार्यासाठी अनुक्रमे रूपये २९,0१७/- व ४९,२00/- एवढा वार्षिक खर्च केलेला दिसून येतो.[३८] दरवर्षी गाडगे महाराज मिशनमार्फत या प्रचार कार्यासाठी काही प्रमाणात खर्च केला जातो.

**मिशन संचलित शाखांवरील खर्च -**

श्री गाडगे महाराज मिशन संचलित आश्रमशाळा, पोस्टबेसिक विद्यालये, वसतिगृह, धर्मशाळा, पाळणाघर, बालिकाश्रम, वृद्धाश्रम, वाचनालय इत्यादी शाखांचा समावेश होतो. त्यासाठी गाडगे महाराज मिशनला शासनाकडून वार्षिक अनुदान मिळते.

सन १९९२-९३ मध्ये मिशन संचलित वरील शाखांवर रूपये २७0७३२२0 /- एवढा वार्षिक खर्च झालेला दिसून येतो.[३९]

**स्थावर मालमत्ता -**

श्री गाडगे महाराज मिशन संचलित शाखांच्या इमारती, वसतिगृहांच्या इमारती, आश्रमशाळांच्या मालकीच्या जमीनी, आश्रमशाळांची मैदाने, गुरांचे गोठे, स्वयंपाक घरे, पिठाच्या गिरणीचे शेड, प्रयोग शाळा हॉल, कर्मचारी निवास अशाप्रकारच्या मालमत्तेचा समावेश मिशनच्या स्थावर मालमत्तेमध्ये होतो.

सन १९९२-९३ मध्ये गाडगे महाराज मिशनची स्थावर मालमत्ता रूपये ४१३९८१२/- एवढी होती.[४०] सन २००२ मध्ये श्री गाडगे महाराज मिशनची स्थावर मालमत्ता रूपये ६७७४८३९/- एवढी असल्याचे दिसून येते.[४१]

याशिवाय गाडगे महाराज मिशनच्या इतर काही आर्थिक बाजू आहेत. गाडगे महाराज मिशनची वार्षिक ताळेबंद पत्रके प्रयत्न करूनही उपलब्ध झाली नाहीत. याचे कारण म्हणजे २००५ साली मुंबई येथे झालेल्या अतिवृष्टीमुळे महापूराचे पाणी मिशनच्या मुख्यालयामध्ये शिरले होते. त्यामुळे बरीच कागदपत्र खराब झाली होती. त्यामुळे मिशनची आर्थिक बाजू सविस्तरपणे मांडणे शक्य झाले नाही.

**समारोप -**

श्री गाडगे महाराज मिशनच्या प्रशासनामध्ये टप्प्या-टप्प्याने बदल होत गेला आहे इ.स. १९५२ मध्ये मिशनची स्थापना केल्यानंतर मिशनचे संस्थापक श्री गाडगेबाबांनी मिशनच्या प्रशासनाची छोटीशी प्रशासकीय रचना तयार केली होती. मिशन प्रशासनामध्ये अध्यक्ष, उपाध्यक्ष खजिनदार, सेक्रेटरी आणि अन्य ११ सभासदांचा समावेश होता. त्यांच्यामार्फत मिशनचे सुरूवातीच्या कालखंडातील प्रशासन चालविले जात होते. सन १९५२ पासून मिशनचा शाखाविस्तार वाढत होता. इ.स.१९७० पर्यंत मिशन संचलित शाखांची संस्था ३७ पर्यंत पोहचली होती. मिशनच्या या विस्तारित कार्याची जबाबदारी सुरूवातीच्या कालखंडातील प्रशासनाला चालविणे कठीण होऊ लागल्यानंतर त्यांनी मिशनच्या मूळ घटनेत सन १९७१ साली बदल करून त्यात सर्वसाधारण समिती, केंद्रीय कार्यकारी मंडळ, आजीव सेवक, हितचिंतक, प्रचारक इत्यादी घटकांचा समावेश केला. प्रत्येक शाखांसाठी संचालकांची नेमणूक केली. त्यामुळे मिशनच्या केंद्रीय प्रशासनावर पडणारा कामाचा ताण कमी झाला. प्रशासन सुसूत्रता आली. त्यामुळे मिशनच्या कार्याला गती मिळाली. गाडगे महाराज मिशनला अनेक आर्थिक अडचणींना तोंड घावे लागले असले तरी मिशनच्या नेतृत्वाने यावार मात केली. आर्थिक अडचणी सोडविण्यासाठी खाजगी देणग्या मिळाल्या. धर्मादाय देणग्यांची मदत घेली. शासणाकडून

अनुदान मिळू लागल्यानंतर मिशनच्या आर्थिक आडचणी कमी झाल्याचे दिसून येते. श्री गाडगे महाराज मिशनच्या कार्यविस्तारात वाढ झाली. मिशनच्या कार्यक्षम प्रशासनामुळे महाराष्ट्रात आज १५० पेक्षा अधिक शाखा लोकोपयोगी कार्य करत आहेत. या सर्वांचे श्रेय श्री गाडगे महाराज मिशनच्या प्रशासनला दयावे लागते.

## संदर्भ साधने :

१. पाटील प.ह., दीनांचा कैवारी, पृ. - ४५.

२. पाटील प.ह., तोचि साधु ओळखावा, २००३, पृ.-१०.

३. श्री गाडगे महाराज मिशन घटना दुरूस्ती पुस्तिका, १९८७, पृ.- २-३.

४. कित्ता, पृ.-४.

५. कित्ता, पृ. -४- ५.

६. कित्ता, पृ.-५ -६.

७. कित्ता, पृ.- २.

८. कित्ता, पृ.- ६- ७.

९. कित्ता, पृ.- ७.

१०. कित्ता, पृ.- ३.

११. कित्ता, पृ.- ७-८.

१२. श्री माने यशवंतराव, (अध्यक्ष, गाडगे महाराज मिशन, मुंबई) यांची गोंदवले बु" येथे दि.२९.१०.२००८ रोजी घेतलेली मुलाखत.

१३. श्री गाडगे महाराज मिशन घटना दुरूस्ती पुस्तिका, उपरोक्त, पृ.- ११.

१४. वेरूळकर उषा., संत गाडगे बाबा : व्यक्ती आणि कार्य, पृ.- १८३-१९७.

१५. खांडवे तु.धो. (संपा.), श्री गाडगे बाबा त्रैमासिक, (आक्टों, नोव्हें, डिसें)२००२, पृ.१ .

१६. भोसले द.ता., लोकोत्तर गाडगेबाबा : जीवन आणि कार्य, पृ.- २६१- २६२.

१७. श्री शिंदे मा.य. यांची ताथवडा ता.फलटण येथे दि.८.११.२००८ रोजी घेतलेली मुलाखत.

१८. श्री महानवर शि.आ.संचालक, प्राथमिक आश्रमशाळा, येळेवाडी यांची दि.१५.११.२००८ रोजी घेतलेली मुलाखत.

१९. प्राथमिक आश्रमशाळा येळेवाडी येथील भितीपत्रकावरून सदरची दैनंदिनी घेतलेली आहे.

२०. श्री. महानवर ता.ना.अधिक्षक संत गाडगे महाराज विद्यार्थी वसतिगृह येळेवाडी यांची दि.१०.११.२००८ रोजी घेतलेली मुलाखत.

२१. गमे ना.धों.,उपशिक्षक प्राथमिक आश्रमशाळा येळेवाडी यांची दि.१५.११.२००८ रोजी घेतलेली मुलाखत.

२२. श्री गाडगे महाराज मिशन, सुवर्णमहोत्सव विशेषांक - १९५२-२००२, पृ. - १०७, १३९ .

२३. श्री गाडगे महाराज मिशन अहवाल, सन- १९९१-९२, पृ. - २३,२४.

२४. श्री गाडगे महाराज मिशनचे संस्थापक सदस्य व विद्यमान कार्यकारी अध्यक्ष श्री यशवंतराव माने यांची दि.२३.१२.२००८ रोजी येळेवाडी येथील आश्रमशाळेत घेतलेली मुलाखत.

२५. जोशी ओंकारनाथ ( संपा.), श्री गाडगेबाबा त्रैमासिक, आक्टो १९८२, पृ.- २६.

२६. खांडवे तु.धों. (संपा.), श्री गाडगे महाराज मिशन सुवर्णमहोत्सव विशेषांक, १९९५२ - २००२, पृ. ८० - १००.

२७. श्री संत गाडगे महाराज प्राथमिक आश्रमशाळा, येळेवाडी येथील शाखेच्या उपशिक्षिका सौ. सुरेखा. शि महानवर यांची दि २४.१२.२००८ रोजी घेतलेली मुलाखत.

२८. सन- १९९१ च्या गाडगे महाराज मिशनच्या ताळेबंद पत्रकातील माहितीवरून.

२९. सन- २००२ च्या श्री गाडगे महाराज मिशनच्या ताळेबंद पत्रकातील माहितीवरून.

३०. श्री गाडगे महाराज मिशन अहवाल, सन- १९९२- ९३, पृ.- ५२.

३१. कित्ता, पृ.-५६.

३२. श्री लोखंडे धुळदेव, मुख्याध्यापक श्री गाडगे महाराज माध्यमिक हायस्कूल गोंदवले बु॥ यांची दि २४. १२.२००८ रोजी घेतलेली मुलाखत.

३३. सन- १९९२ च्या गाडगे महाराज मिशनच्या ताळेबंद पत्रकातील माहितीवरून.

३४. श्री गाडगे महाराज मिशन अहवाल, सन- १९९२-९३, पृ.- ६४-६७.

३५. सन १९९१ च्या श्री गाडगे महाराज मिशनच्या ताळेबंद पत्रकावरून.

३६. श्री गाडगे महाराज मिशन, अहवाल सन-१९९२- ९३, पृ.- ६४-६७.

३७. वर्ष १९९१ व वर्ष २००२ मधील श्री गाडगे महाराज मिशनच्या ताळेबंद पत्रकावरून.

३८. कित्ता, ताळेबंद वर्ष १९९१ व वर्ष- २००२.

३९. श्री गाडगे महाराज मिशन अहवाल, सन- १९९२-९३, पृ.- ५८-६०.

४०. कित्ता, पृ. - ६२, ६३.

४१. सन २००२ च्या श्री गाडगे महाराज मिशनच्या ताळेबंद पत्रकातील माहितीवरून.